नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १५५ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार, दि. ०८ मे २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

### तमिळनाडूला एक न्याय
## महाराष्ट्र, कर्नाटकला दुसरा न्याय
### विजय यांच्या वाट्याला प्रतीक्षाच, सर्वाधिक जागा मिळालेल्या भाजपला राज्यपालांचे आमंत्रण

मुंबई : (स. गांवकरी)

बहुमतासाठी ११८ आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र सादर करण्याची अट तमिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी सर्वाधिक जागा जिंकलेल्या टीव्हीके पक्षाचे नेते विजय यांच्यासमोर ठेवल्याने सत्ता स्थापनेचा तिढा दुसऱ्या दिवशीही सुटू शकलेला नाही. पण २०१४ व २०१९ मध्ये महाराष्ट्रात तर २०१८ मध्ये कर्नाटकात पुरेसे संख्याबळ नसतानाही तत्कालीन राज्यपालांनी केवळ सर्वाधिक मोठा पक्ष म्हणून भाजपला सरकार स्थापण्यास पाचारण केले होते. यावरून भाजपला एक तर विरोधकांना दुसरा न्याय का, असा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केला आहे.



सर्वाधिक जागा जिंकलेल्या पक्षाला सरकार स्थापन करण्यासाठी पाचारण करावे, असे सर्वोच्च न्यायालयाने निकालांमध्ये यापूर्वी अनेकदा स्पष्ट केले आहे. तसेच बहुमताची परीक्षा ही सभागृहातच घेतली जावी, असे एस. आर. बोम्मई विरुद्ध भारत सरकार या गाजलेल्या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला होता. 'कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नसताना राज्यपालांनी निवडणूक पूर्व किंवा निवडणुकीनंतरच्या आघाड्यांच्या संख्याबळाचा विचार करावा. तशी परिस्थिती नसल्यास सर्वाधिक जागा मिळालेल्या पक्षाला सरकार स्थापन करण्यासाठी पाचारण करावे, असे मत लोकसभेचे माजी सचिव तसेच संसदीय कामकाजाचे तज्ज्ञ पी. डी. टी. आचार्य यांनी नोंदविले. त्यासाठी १९९६ मध्ये अटलबिहारी वाजपेयी सरकार स्थापनेचे उदाहरण त्यांनी दिले. वाजपेयी यांच्याकडे बहुमत नसतानाही तत्कालीन राष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा यांनी भाजपला सर्वाधिक जागा मिळाल्या असल्याने वाजपेयी यांना सरकार स्थापण्यासाठी पाचारण केले होते. वाजपेयी सरकार लोकसभेत विश्वासदर्शक ठराव मंजूर करू शकले नाही व १३ दिवसांत हे सरकार कोसळले. १९९८ मध्ये भाजपला सर्वाधिक जागा मिळाल्यावर वाजपेयी यांनी सरकार स्थापनेचा दावा केला असता तत्कालीन राष्ट्रपती के. आर. नारायणन यांनी बहुमतासाठी आवश्यक संख्याबळाचे पत्र सादर करण्याची सूचना केली होती. भाजपने तसे पत्र सादर केल्यावर मग वाजपेयी यांना सरकार स्थापन करण्याकरिता पाचारण करण्यात आले होते याकडेही आचार्य यांनी लक्ष वेधले.

राज्य विधानसभेच्या २०१४ मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपला सर्वाधिक १२२ जागा मिळाल्या होत्या. राज्यात बहुमतासाठी १४५ आमदारांचे पाठबळ आवश्यक असते. निकाल पूर्ण जाहीर होण्यापूर्वीच राष्ट्रवादीने सरकारला बाहेरून पाठिंबा देण्याचे जाहीर केले होते. पण तसे अधिकृत पत्र दिले नव्हते. तरीही तत्कालीन राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी देवेंद्र फडणवीस यांना सरकार स्थापन करण्याकरिता पाचारण केले होते.

सरकार स्थापन करण्याचा दावा फडणवीस यांनी केला तेव्हा १४५ चे संख्याबळ भाजपकडे नव्हते. २०१९ मध्ये देवेंद्र फडणवीस व अजित पवारांचा पहाटेचा शपथविधी गाजला होता. तेव्हा भाजपला १०५ जागा मिळाल्या होत्या. अजित पवारांनी राष्ट्रवादीच्या ५४ आमदारांच्या स्वाक्षऱ्यांचे पत्र सादर केले होते. पण राष्ट्रवादीचे पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी पक्षाने अधिकृतपणे पाठिंबा दिलेला नाही, अशी भूमिका मांडली होती. राष्ट्रवादीच्या अनेक आमदारांनी शरद पवारांना पाठिंबा दिला. परिणामी फडणवीस यांच्या नेतृत्वाखालीस सरकार तीन दिवसांतच कोसळले. कारण या सरकारकडे पुरेसे संख्याबळ नव्हते.

#### कर्नाटकातही संख्याबळ नसताना भाजपला संधी

कर्नाटक विधानसभेच्या २०१८ मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपचे १०४, काँग्रेस ८० तर देवेगौडा यांच्या धर्मनिरपेक्षा जनता दलाचे ३७ आमदार निवडून आले होते. काँग्रेसने भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्याकरिता जनता दलाच्या कुमारस्वामी यांना पाठिंबा दिला. काँग्रेस व जनता दलाने ११७ आमदारांच्या स्वाक्षऱ्यांचे पत्र राज्यपालांना सादर करून सरकार स्थापण्यास पाचारण करण्याची मागणी केली होती. कर्नाटकात बहुमतासाठी ११३ आमदारांची आवश्यकता असते. पण तत्कालीन राज्यपाल वजूभाई वाला यांनी निवडणूक नंतरच्या आघाडीपेक्षा सर्वाधिक जागा मिळालेल्या भाजपला सरकार स्थापन करण्यासाठी पाचारण केले. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले असता २४ तासांत बहुमत सिद्द करण्याचा आदेश न्यायालयाने भाजप सरकारला दिला होता. येडियुरप्पा यांच्या नेतृत्वाखालील भाजपचे सरकार विधानसभेत बहुमत सिद्ध करू शकले नव्हते.










## थोडक्यात पण महत्वाचे



### कलाशिक्षक अभिषेक उदमले यांनी मोराला दिले जीवदान

श्रीगोंदा (स. गांवकरी) : कर्जत तालुक्यातील भैरोबा वाडी रस्त्यावर एक जखमी मोर आढळून आल्याची घटना घडली असून, कलाशिक्षक अभिषेक उदमले आणि सामाजिक कार्यकर्ते सुनील यादव यांनी तत्परता दाखवत त्याचे प्राण वाचवले. अभिषेक उदमले हे कुटुंबासह बाबुळगावकडे जात असताना रस्त्याच्या कडेला जखमी अवस्थेत एक मोर दिसला. मोराच्या डोळ्यावर इतर पक्ष्याने हल्ला केल्यामुळे त्याचे डोळे गंभीर जखमी झाले होते आणि त्याला काहीच दिसत नव्हते. या परिस्थितीत उदमले व यादव यांनी मोराला सावधपणे पकडून सुरक्षित केले. यानंतर अभिषेक उदमले यांनी तात्काळ वन अधिकारी चित्रा शीद यांना दूरध्वनीवरून घटनेची माहिती दिली. काही वेळातच वन विभागाची गाडी घटनास्थळी दाखल झाली. संबंधित मोराला पाणी पाजून त्याला सुखरूप वन अधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आले.अभिषेक उदमले आणि सुनील यादव यांच्या या तत्पर आणि धाडसी कृतीमुळे एका निष्पाप पक्ष्याचे प्राण वाचले असून, त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



### जोरदार वादळी वाऱ्यासह पावसाने घानवळ गावातील कुटुंबावर दुःखाचा डोंगर

पालघर (स. गांवकरी) : मोखाडा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत हिरवे-घानवळ अंतर्गत येणाऱ्या घानवळ गावातील रहिवासी रामजी जानू नडगे यांच्या कुटुंबावर निसर्गाच्या अवकृपेने दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आज दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास झालेल्या जोरदार पाऊस व वादळी वाऱ्यामुळे त्यांच्या घरावरील पत्रे उडून गेली. घटना घडली त्यावेळी घरातील सर्व सदस्य घरात उपस्थित होते. मात्र, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि मोठा अनर्थ टळला. अचानक आलेल्या वादळामुळे घरातील धान्य, कपडे तसेच इतर जीवनावश्यक वस्तू भिजून मोठे नुकसान झाले आहे. नडगे कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असून, कुटुंबातील सदस्य गावात मिळेल ते काम व मोलमजुरी करून उदरनिर्वाह करतात. कुटुंबात एकूण आठ सदस्य वास्तव्यास आहेत. घराचे मोठे नुकसान झाल्याने कुटुंबीयांसमोर गंभीर संकट उभे राहिले आहे. घटनेनंतर कुटुंबातील महिलांना अश्रू अनावर झाले असून, शासनाने तातडीने पंचनामा करून आर्थिक मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांसह कुटुंबीयांनी केली आहे.



### दिव्यातील स्मशानभूमीत छता अभावी नागरिकांची गैरसोय

- ठाणे पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिका हद्दीतील दिवा पश्चिमेतील दिवा गावातील स्मशानभूमी अखेरच्या घटका मोजत असल्याचे चित्र दिसून येत आहे. ठाणे पालिका प्रशासनाच्या दफ्तरी नोंद असलेल्या स्मशानभूमीकडे ठाणे महानगरपालिकेचे पूर्णत:हा दुर्लक्ष झाले असल्याचे दिसून येत आहे. सदर स्मशानभूमीत आजही मूलभूत सुविधांचा अभाव असून नागरिकांना भर उन्हात अंतिमसंस्कार करावे लागत असून उन्हाळा व पावसाळ्यात अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे तसेच सदर स्मशानभूमीत स्वतंत्र अशी पाण्याची देखील पुरेसी सोय उपलब्ध नाही. वापर होत असला तरी येते पालिकेच्या कोणत्याही सुविधा दिल्या गेल्या नाहीत. अतिशय बिकट अवस्थेत असणाऱ्या स्मशान भूमीसाठी अखेर दिवा ग्रामस्थानी एकत्र येऊन लोकवर्गणीतून मातीची भरणी, लोखंडी बर्नर, सिमेंट चौथरा उभारला आहे. परंतु या स्मशान भूमीवर छत नसल्याने उन्हात आणि विशेषतः पावसाळ्यात नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे. ठाणे महानगर पालिकेने याकडे त्वरित लक्ष घालून इथे मूलभूत सुविधा छत, पाणी, बसण्यासाठी व्यवस्था, लाईटची सोय करावी अशी दिवा पश्चिमेतील नागरिकांनी मागणी आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते डॉ. दुधभाते यांच्या 'नेत्रकोष'चे प्रकाशन



मुंबई / पुणे (स. गांवकरी) : पुण्यातील प्रख्यात नेत्ररोग तज्ञ डॉ. अनिल दुधभाते लिखित 'नेत्रकोष' या पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रसन्न वातावरणात पार पडले. साध्या आणि सोप्या भाषेत लिहिलेल्या या पुस्तकाचे अवलोकन करताना मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले. या पुस्तकाला ज्येष्ठ नेत्ररोग तज्ञ डॉ. तात्याराव लहाने तसेच प्रसिद्ध 'दीक्षित डाएट' संकल्पनेचे जनक डॉ. जगन्नाथ दीक्षित यांची प्रस्तावना लाभली आहे. 'नेत्रकोष' या पुस्तकामध्ये डोळ्यांच्या विविध आजारांबाबत अत्यंत सोप्या आणि सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत माहिती देण्यात आली आहे. प्रत्येक आजाराचे कारण, तो टाळण्यासाठी घरच्या घरी करता येणाऱ्या उपाययोजना, तसेच आजार झाल्यास प्राथमिक पातळीवर कोणती काळजी घ्यावी आणि नेत्रतज्ञांचा सल्ला केव्हा घ्यावा, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे.

# वाघापूर येथे संयुक्त जयंती उत्सव उत्साहात संपन्न!

अकोले : (स. गांवकरी)



अकोले तालुक्यातील वाघापूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर आणि महात्मा जोतिबा फुले यांच्या संयुक्त जयंती उत्सवाचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच सिताराम लांडे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार डॉ. किरण लहामटे उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार डॉ. किरण लहामटे यांनी सांगितले की, "घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित, बहुजन, आदिवासी तसेच सर्व दुर्बल घटकांसाठी कार्य केले. समाजातील वंचितांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षणासारखी प्रभावी व्यवस्था निर्माण करून त्यांना सबल करण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले. त्यांचे कार्यकर्तृत्व प्रत्येक भारतीयासाठी अभिमानास्पद आहे."

तसेच वाघापूर येथील मुळा नदीवरील पूल, लिंगदेव येथील एमआयडीसी तसेच सिद्धार्थनगरमधील रस्त्याचे काम लवकरच मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी दिले. मुळा नदीत नवीन पाणी निर्माण प्रकल्प पूर्ण केल्याशिवाय संगमनेर तालुक्यातील पठार भागाला पाणी योजनेचे पाणी देणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमादरम्यान आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या निधीतून सिद्धार्थनगर येथे बांधण्यात आलेल्या ३० लाख रुपये खर्चाच्या सभामंडपाचे तसेच ७ लाख रुपये खर्चाच्या समाजमंदिराचे लोकार्पण त्यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सिताराम लांडे, राहुल गायकवाड, रोहन गायकवाड, मारुती लांडे, सुरेश गायकवाड, सुनील डोळस, पत्रकार सुनील गीते, सखाराम लांडे आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास सरपंच रंजनाताई बराते, माजी सरपंच मंदाताई बराते, संजय औटी, उपसरपंच महेंद्र बराते, मिलिंद जाधव, गुलाब जगताप, योगेश लांडे, श्रीकांत गायकवाड, रवी गायकवाड, शुभम निकाळे, विनोद शिंदे, संजय फुलसुंदर, धम्मपाल निकाळे, सुनील रकटे, संजय जगताप, प्रदीप जगताप, बंटी जगताप, साहिल जगताप, महादू लांडे, मनेश गायकवाड, अनिल जाधव, धनंजय रकटे, युवराज गायकवाड, प्रियंका शिंदे, संध्या शिंदे, गणपत बराते, कुंडलिक गंभीरे, हिरामण गंभीरे, भरत गंभीरे, राजेंद्र गंभीरे, मारुती वाजे, सखाराम गंभीरे, बाबाजी रकटे, सोपान रकटे, रोहिदास आरोटे, संतोष लांडे, म्हतू लांडे, भागवत बराते, स्वप्नील आवटी, विशाल बराते, दादाभाऊ वाघमारे, जितेंद्र बराते, सावरगावकर, बाळासाहेब निळे, शुभम लांडे, ऋषिकेश लांडे, किरण जगधने, पप्पू भालेराव, राजेश देठे, देवराम खरात, रावसाहेब लांडे, समाधान औटी आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सूर्यभान शिंदे यांनी केले, तर भीमराज रकटे यांनी आभार प्रदर्शन केले.

## चाकणे यांची पुरस्कारासाठी निवड

श्रीगोंदा : (स. गांवकरी)



आढळगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयातील कर्मचारी मच्छिंद्र चाकणे यांची यावर्षीच्या "माजी प्राचार्य एन. आर. माने निष्ठावान गुणी रयत सेवक" पुरस्कारासाठी निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल रयत परिवारासह शिक्षणप्रेमींमधून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मच्छिंद्र चाकणे हे रयत शिक्षण संस्थेमध्ये सन १९९० पासून कार्यरत असून त्यांनी आपल्या सेवेला सुरुवात चांडगाव येथील शाखेत शिपाई पदावरून केली. प्रारंभीच्या काळात नव्याने सुरू झालेल्या शाखेच्या विकासासाठी त्यांनी विनामोबदला काम करत संस्थेबद्दलची निष्ठा अधोरेखित केली. शिपाई पदावर कार्यरत असतानाही त्यांनी लेखनिक म्हणून जबाबदाऱ्या पार पाडत संस्थेच्या कामकाजात महत्त्वपूर्ण योगदान दिले. चांडगाव व आढळगाव येथे केलेल्या उल्लेखनीय कार्याचे संस्थेकडून मूल्यमापन करण्यात आल्यानंतर त्यांची या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. येत्या ८ मे रोजी सातारा येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या निवडीबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राहुलदादा जगताप, जनरल बॉडी सदस्य बाबासाहेब भोस, उत्तर विभाग निरीक्षक नवनाथ बोडखे, जनरल बॉडी सदस्य सुभाषलाल गांधी, खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष शरद जमदाडे, प्राचार्य भाऊसाहेब गदादे, पर्यवेक्षक विक्रम घालमे, ग्रामपंचायत सदस्य उत्तमराव राऊत, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य नानासाहेब बोळगे, राजाराम काळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शरद शिंदे, उपाध्यक्ष अर्चना जाधव तसेच ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## पत्रकारिता व सामाजिक कार्यासाठी सौ. राजश्री चौधरी यांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांचा 'तापी सन्मान २०२६' जाहीर!

धुळे : (स. गांवकरी)



पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सौ. राजश्री राहुल चौधरी यांची "तापी सन्मान २०२६" या राज्यस्तरीय प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई-धुळे यांच्या वतीने हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

धुळे शहरातील नगाव बारी चौफुली, देवपूर येथील केशरानंद मंगल कार्यालयात दिनांक १२ जुलै २०२६ रोजी राज्यस्तरीय अधिवेशन २०२६ मोठ्या दिमाखात आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनात राज्यभरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये पत्रकार रत्न २०२६, तापी सन्मान २०२६ तसेच उद्योग रत्न २०२६ या पुरस्कारांचा समावेश आहे. सौ. राजश्री चौधरी या सबला उत्कर्ष वृत्तपत्राच्या मुख्य संपादक म्हणून दिल्ली व महाराष्ट्रात कार्यरत असून, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या दिल्ली संपर्क प्रमुख म्हणूनही त्या जबाबदारी पार पाडत आहेत. पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांची या सन्मानासाठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री मा. जयकुमार रावल, धुळे शहराचे आमदार मा. अनुप अग्रवाल, धुळे लोकसभेच्या खासदार मा. शोभाताई बच्छाव, महापौर मा. मायादेवी परदेशी तसेच ज्येष्ठ नेते मा. कुणाल पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे, मा. चंद्रकांत रघुवंशी, मा. गजेंद्र शेठ पिंपळकर, मा. राम भदाणे (आमदार ग्रामीण), मा. संजय भोकरे (संस्थापक, मराठी पत्रकार संघ), मा. डॉ. विश्वासराव आरोटे (राज्य सरचिटणीस), मा. निलेश सोमाणी (प्रदेशाध्यक्ष), मा. वैभव स्वामी (संपर्क प्रमुख), मा. किशोर साकडा (उपाध्यक्ष), मा. रावसाहेब गिरासे (संचालक, ए.पी. एम.सी. नवी मुंबई) यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच नाशिक, जळगाव, अहिल्यानगर व नंदुरबार येथील जिल्हाधिकारी आणि धुळे, नाशिक ग्रामीण, जळगाव व अहिल्यानगर येथील पोलीस अधीक्षक यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई-धुळेच्या वतीने देण्यात आली आहे.

## आदिवासी भागातील पाणीटंचाई ही प्रशासनाची उदासीनता

शिवनेरी: (स. गांवकरी)



जुन्नर तालुक्यातील आदिवासी भागातील पाणीटंचाई ही केवळ नैसर्गिक समस्या नसून प्रशासनाची उदासीनता आहे .असे पंचायत समिती कार्यालय येथे आदिवासी दुर्गम भागातील शेतकरी व महिला भगिनी यांनी हंडा मोर्चा यांच्या आंदोलन प्रसंगी भावना आदिवासी शेतकरी संजय साबळे यांनी सांगितले. आदिवासी शेतकरी संजय साबळे यांनी सांगितले की , आठ बुडीत बंधाऱ्यांसाठी केवळ सर्वेक्षणावर २८ लाख रुपये खर्च करण्यात आले, तर त्यांच्या बांधकामासाठी तब्बल २९ कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे—मात्र प्रत्यक्ष कामांची कोणतीही ठोस प्रगती दिसून येत नाही. पुणे जिल्हा परिषदेचा या वर्षीचा २३०० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मांडला , त्यातील किमान ८०० कोटी रु तरी समाजकल्याणासाठी राखीव असावेत . जुन्नर तालुक्यातील १२ गावे व त्यातील १७,००० आदिवासी नागरिकांना पंचायत समिती कार्यालय पाणीपुरवठा यांच्या २८ टँकरवर अवलंबून राहावे लागते, ही अत्यंत गंभीर व लाजिरवाणी बाब आहे. निमगिरीसह १२ ग्रामपंचायतींमध्ये दरवर्षी पाणीटंचाईची पुनरावृत्ती होत आहे. निमगिरी ग्रामपंचायतीमध्ये १७ लाख रुपयांचा पेसा निधी पडून असूनही तो खर्च करण्यात आलेला नाही, तर जलजीवन योजनेसाठी मंजूर ४ कोटी ८५ लाख रुपयांची कामे अद्याप अपूर्ण अवस्थेत आहेत.

साधारणपणे आदिवासी बांधवांकडे असलेली साडेनऊशे( ९.५) हेक्टरपेक्षा अधिक जमीन कोरडवाहू आहे . तालुक्यात १३ लहान-मोठी धरणे अस्तित्वात आहेत, परंतु त्या पाण्याचा थेंबही स्थानिक आदिवासी बांधवांना मिळत नाही. या धरणाचे पाणी जामखेड आणि सोलापूरपर्यंत पोहोचवले जाते, पण धरणांच्या पायथ्याशी राहणाऱ्या लोकांना मात्र टँकरवर अवलंबून राहावे लागते हा अत्यंत मोठा विरोधाभास आहे . पंचायत समिती जुन्नर येथे निमगिरी ग्रामस्थांनी प्रत्यक्ष येऊन सभापती, गटविकास अधिकारी यांची भेट घेतली असता, "वार्षिक आराखड्यात पाणीप्रश्नाचे नियोजन करू" असे नेहमीचेच आश्वासन देण्यात आले. ज्या जमिनी धरणांसाठी अधिग्रहित केल्या, त्याच जमिनींचे मालक आज पाण्यापासून वंचित आहेत. आजही आदिवासी माता-भगिनींना डोक्यावर हंडा घेऊन पाणी आणावं लागतं—ही वस्तुस्थिती अत्यंत वेदनादायक आहे.

आता वेळ आली आहे ती केवळ आश्वासनांची नाही, तर जाब विचारण्याची. २८ लाखांचा सर्वे, २९ कोटींचा मंजूर निधी, कोट्यवधींचे बजेट—

पण पाणी का नाही ! जर तात्काळ ठोस निर्णय घेऊन कामे पूर्ण करण्यात आली नाहीत, तर आदिवासी भागातील जनतेचा रोष उफाळून येईल आणि "हक्काचं पाणी" मिळवण्यासाठी तीव्र आंदोलन उभं राहील. असे पंचायत समिती कार्यालय येथे हंडा मोर्चा आंदोलन प्रसंगी समन्वयक, आदिवासी अधिकार मंच संजय साबळे यांनी समाजाच्या वतीने भावना व्यक्त केल्या.

## जागतिक दर्जाच्या थीम पॅव्हेलियनची भव्य मांडणी

मुंबई : (स. गांवकरी)



महालक्ष्मी सरस २०२६ यंदा आपल्या भव्य थीम पॅव्हेलियन, आकर्षक सजावट आणि जागतिक दर्जाच्या संकल्पनेमुळे विशेष चर्चेत आले आहे. महाराष्ट्राची संस्कृती, ग्रामीण जीवन, महिला सक्षमीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा सुंदर संगम यंदाच्या पॅव्हेलियनमध्ये पाहायला मिळत आहे. यंदाची मुख्य थीम महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या द्विशताब्दी वर्षाला समर्पित करण्यात आली आहे. स्त्रीशिक्षण, सामाजिक परिवर्तन आणि शिक्षणप्रसारासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाला अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यात आले आहे. मुख्य प्रवेशद्वार, बाह्य सजावट, मुख्य मंच आणि विविध भागांमध्ये फुले दांपत्यांचे विचार आणि कार्य प्रभावी दृश्यरूपातून साकारण्यात आले आहे. यंदाच्या सरसमधील सर्वात मोठे आकर्षण म्हणजे सुमारे ४० मीटर लांब आणि ७ मीटर उंचीचा भव्य त्रिमितीय एलईडी पडदा. अत्याधुनिक दृश्यतंत्रज्ञानाचा वापर करून उभारण्यात आलेल्या या पडद्यावर महिला बचत गट, ग्रामीण विकास, "लखपती दीदी" उपक्रम, तसेच महाराष्ट्राच्या संस्कृतीचे प्रभावी दृश्यरूप सादर करण्यात येत आहे. पडद्यावरील दृश्ये प्रत्यक्ष बाहेर येत असल्याचा अनुभव नागरिकांना मिळत असून, हा भाग विशेष आकर्षण ठरत आहे. महाराष्ट्रातील प्रदर्शन संस्कृतीमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात उभारण्यात आलेला हा दृश्य अनुभव जागतिक स्तरावरील प्रदर्शनांची अनुभूती देणारा ठरत आहे.

# ग्रामपंचायतीतील अनागोंदी कारभाराची चौकशी करावी

पारनेर : (स. गांवकरी)

- ग्रामसेवकांना निलंबित व चौकशीची मागणी
- विभागीय आयुक्तांसह सीईओंना निवेदन



तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक बाळासाहेब दावभट यांच्या अनागोंदी कारभाराची चौकशी करावी व कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी निलंबित करावे अशी मागणी टाकळी ढोकेश्वरचे सेवा संस्थेचे माजी संचालक बाळशिराम पायमोडे,संतोष बांडे, विक्रम झावरे,संकेत झावरे,माजी ग्रा.पं.

सदस्य किसन धुमाळ,अंकुश पायमोडे, गणेश चव्हाण, मळीभाऊ रांधवन यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.यासबंधीचे लेखी निवेदन विभागीय आयुक्तांसह मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी व गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांना देण्यात आले आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पत्रव्यवहारा नंतरही ग्रामसेवक बाळासाहेब दावभट यांनी पाच वर्षाचा ऑडिट अहवाल तक्रारदारांना दिला नाही मात्र उद्या देवू, परवा देऊ, मिटींग आहे, अशी उडवा उडवाची ची उत्तरे २/३ महिन्यां पासून देत आहेत. तरी त्यांच्यावर कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी कारवाई करावी अशी मागणी पण या निवेदनात करण्यात आली आहे.टाकळी ढोकेश्वर मध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत निकृष्ट दर्जाचे कामे करण्यात आलेली असून लोकवस्ती नसताना किंवा एकट्या घरासाठी सिमेंट काँक्रीटचे रस्ते करण्यात आलेले आहेत. त्या रस्त्यांवरचा झालेला खर्च ग्रामसेवक,ठेकेदार, सरपंच यांच्याकडून शासनाने वसूल करून लोकवस्ती असलेल्याच ठिकाणी हे रस्ते करून द्यावेत.

या निवेदनात म्हटले आहे की टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सुमारे सन २०२१ ते २०२५ या पाच वर्षापासून अनागोंदी कारभार चालू आहे.५ वर्षांच्या कालावधीत कार्यरत असणारे सर्व ग्रामसेवक यांनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचा संशय व्यक्त केला आहे.तसेच १५ वा वित्त आयोग/जल जीवन मिशन पाणी योजना/दलित वस्ती सुधार योजना व इतर वैयक्तिक लाभाची योजना मध्ये भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच काही विकासकामे न करता शासकीय निधीचा अपहार केलेला आहे. तसेच शासकीय निधीतून चुकीची कामे केलेली असून रस्ते, पेव्हिंग ब्लॉक,विज,पथदिवे, हायमॅक्स, दलित वस्ती पिण्याचे पाणी पाईपलाईन, पाण्याची टाकी, कचरा घंटागाडी असे सर्व कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता असून काही कामे न करता संपूर्ण बिले काढण्यात आली असल्याचा आरोप करण्यात आला आहे.ग्रामपंचायतकडे तक्रार अर्ज केले असता ग्रामसेवक आम्हाला म्हणाला कि कोणाला काय करायचे ते करून घ्या मी कोणालाही घाबरत नाही मी अधिकारांना टक्केवारी देत आहे. सर्वांना खिशात घेऊन फिरतो पंचायत समिती, जिल्हा परिषद तर किरकोळ आहेत. तसेच ग्रामसेवक कधीही मुख्यालय राहत नाही त्यांनी खोटा रहिवासी दाखला देऊन शासनाची फसवणूक करत शासनाचा रहिवासी भत्ता हडप केलेला आहे.त्यामुळे या अनागोंदी कारभाराची चौकशी करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायतीमध्ये रोहयोसह शासनाच्या १५ वा वित्त आयोग व विविध योजनांच्या माध्यमातून जी विविध विकास कामे करण्यात आली आहे ती सर्व शासकीय कामे शासन नियम व टेंडरनुसार प्रक्रिया करून करण्यात आली आहे.त्यामुळे यामध्ये या कामांमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता नसून स्थानिक राजकीय मतभेदांमुळे हे आरोप करण्यात आले आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## प्रत्येकाने रक्तदानाचा संकल्प करावा - सागरनंद गिरी जी महाराज

अहिल्यानगर (स. गांवकरी) : रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्तदानाविषयी जनजागृती होणे आवश्यक आहे.प्रत्येकाने वर्षातून एकदा तरी रक्तदान करावे.सध्या सर्वत्र रक्ताचा तुटवडा होत असल्याने रुग्णांसाठी रक्त मिळविणे ही एक समस्या झाली आहे.रक्त कोणत्याही फॅक्टरी तयार होत नसल्याने व रक्त हे मानवनिर्मित असल्याने प्रत्येकाने रक्तदानाचा संकल्प करावा.तसेच पर्यावरणाच्या रक्षणासाठी बेलवृक्षाचे रोपण करावे. असे प्रतिपादन सागर नंदगिरी जी महाराज गुरु बहुरुपी जनार्दन स्वामी महाराज यांनी केले आहे. बेलवृक्ष बाबा चैतन्य स्वामी सागरनंद गिरी जी महाराज गुरु बहुरुपी जनार्दन स्वामी महाराज यांनी अनेक वेळा रक्तदान केले आहे.श्रीक्षेत्र वृध्देश्वर येथे सागर नंदगिरी महाराज यांनी रक्तदान केले. सध्या सर्वत्र रक्ताचा तुटवडा आहे.हे लक्षात आल्यानंतर रा.स्व.संघ संचालित जनकल्याण रक्तकेंद्राला सदिच्छा भेट दिली व रक्तदान शिबिराचे आयोजन करणार असल्याचे सांगितले. यावेळी रक्त केंद्राचे प्रशासकीय अधिकारी सागर उंडे,अकाउंट अधिकारी गजेंद्र सोनवणे, जनसंपर्क अधिकारी विलास मढीकर,डॉ.सौ.देशपांडे यांनी प्रशस्तीपत्रक देऊन सागरनंद गिरी जी महाराज यांचा सत्कार केला.

## शिवगंगा सोसायटीतील दोन घरे फोडून दागिने व रोकड लंपास"



नायगाव (स. गांवकरी) : नायगाव शहरातील शंकर नगर परिसरातील शिवगंगा सोसायटी मध्ये चोरट्यांनी चोरी करत दोन घरे फोडल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेत दिंगबर वल्हे व नागेश्वर यादव यांच्या घरातून दागदागिने व सुमारे ५० हजार रुपयांची रोकड चोरट्यांनी लंपास केल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, वल्हे कुटुंबीय ज्या खोलीत झोपले होते त्या खोलीस बाहेरून कडी लावून चोरट्यांनी ही चोरी केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. याबाबत दिंगबर वल्हे यांनी नायगाव पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून, चोरट्यांनी अत्यंत चलाखीने ही चोरी केल्याचे स्पष्ट होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी दोन्ही घरांचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील कपाटे व सामान अस्ताव्यस्त करत त्यांनी मौल्यवान दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. सकाळी ही घटना लक्षात येताच परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पहाटे सुमारे साडेचार वाजता पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी तत्काळ डॉग स्क्वॉड व फिंगरप्रिंट पथकाला पाचारण करून तपास सुरू केला. घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला असून चोरट्यांच्या हालचालींबाबत पुरावे गोळा करण्यात आले आहेत. दरम्यान, आयपीएस अधिकारी शशांत सर, पोलीस उपनिरीक्षक तोटावर तसेच बीट जमादार साई सांगवीकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून रात्रीच्या वेळी पोलिसांनी गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## पाणीटंचाई दूर करण्यासाठी लोकप्रतिनिधींचे प्रयत्न यशस्वी

किनवट (स. गांवकरी) : शहरातील प्रभाग क्रमांक ८ मध्ये गेल्या अनेक वर्षांपासून तीव्र पाणीटंचाईची समस्या नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत होती. विशेषतः गुरुकुल परिसर, मार्कंडे मंदिर परिसर, अयोध्या नगर तसेच भुई गल्ली या भागांमध्ये उन्हाळ्याच्या दिवसांत पाण्यासाठी नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत होत्या. मात्र आता नगराध्यक्षा सुजाता येंड्रलवार, शिवसेना (शिंदे गट) शहर प्रमुख तथा नगरसेवक सुरज सातुरवार आणि सामाजिक कार्यकर्ते प्रभू कोल्हे यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे या समस्येवर मोठ्या प्रमाणात मात करण्यात यश आले आहे. प्रभागातील वाढती पाणीटंचाई लक्षात घेऊन संबंधित लोकप्रतिनिधींनी विविध ठिकाणी विंधन विहिरी (बोअरवेल) खोदण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार प्रभागातील अनेक भागांमध्ये विंधन विहिरींची कामे हाती घेण्यात आली असून बहुतांश ठिकाणी मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध झाले आहे. त्यामुळे नागरिकांना नियमित पाणीपुरवठा होण्यास मदत होत आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमामुळे प्रभाग क्रमांक ८ मधील सुमारे ८० टक्के पाणीटंचाई दूर करण्यात यश मिळाल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे. काही तुरळक भाग वगळता बहुतांश परिसरात आता पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त करत लोकप्रतिनिधींच्या कार्याचे कौतुक केले आहे. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, दरवर्षी उन्हाळ्यात पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत होती. अनेक वेळा टँकरवर अवलंबून राहावे लागत होते. मात्र आता नवीन विंधन विहिरींमुळे परिस्थितीत लक्षणीय सुधारणा झाली असून महिलांची व नागरिकांची पाण्यासाठी होणारी धावपळ कमी झाली आहे.

# संघर्षाचा 'महामेरु' : संगमनेरच्या राजकारणातील जायंट किलर आमदार अमोल खताळ!

संगमनेर : (स. गांवकरी)

**जगाच्या राजकीय इतिहासात वेळोवेळी अशा व्यक्तिमत्त्वांचा उदय झाला आहे, ज्यांनी सामान्य कष्टकऱ्यांच्या बळावर प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान दिले आणि इतिहासाच्या पानांवर स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. रशियात व्लादिमीर लेनिन यांनी जनसामान्यांच्या शक्तीवर क्रांती घडवली, तर अमेरिकेत अब्राहम लिंकन यांनी अत्यंत सामान्य परिस्थितीतून देशाच्या सर्वोच्च पदापर्यंत मजल मारली. याच परंपरेत महाराष्ट्राच्या राजकारणात आणि विशेषतः संगमनेरच्या भूमीत एक नाव आज ठळकपणे घेतले जाते, ते म्हणजे आमदार अमोल धोंडीबा खताळ.**





**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

"आकाशाशी जडले नाते,
धरणीमाता आपली...
कष्टाच्या या घामातूनच,
स्वप्ने होतात साजिरी..."

या ओळींप्रमाणेच अमोल खताळ यांचा जीवनप्रवास हा संघर्ष, जिद्द आणि लोकसेवेच्या भावनेतून घडलेला आहे. एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या अमोल खताळ यांनी पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर संगणक क्षेत्रातील तंत्रज्ञान आत्मसात करत त्यांनी सुमारे वीस वर्षांपूर्वी एका छोट्याशा सायबर कॅफेतून आपल्या व्यावसायिक कारकिर्दीची सुरुवात केली. आज ज्याला 'स्टार्ट-अप' संस्कृती म्हटले जाते, त्याचा पाया त्यांनी त्याकाळातच आपल्या मेहनतीच्या जोरावर रचला होता.

मात्र, स्वतःचा विकास करून थांबणे हा त्यांचा स्वभाव नव्हता. समाजातील वंचित, गरजू आणि दुर्लक्षित घटकांचे प्रश्न त्यांना सतत अस्वस्थ करत राहिले. संत तुकोबारायांच्या "जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुला" या विचाराने प्रेरित होत त्यांनी लोकांमध्ये काम करण्यास सुरुवात केली आणि याच सामाजिक जाणीवेतून त्यांच्या राजकीय प्रवासाचा जन्म झाला.

संगमनेरला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा मिळावा या मागणीसाठी त्यांनी राबवलेले ऐतिहासिक 'स्वाक्षरी अभियान' हे त्यांच्या संघर्षशील नेतृत्वाचे पहिले मोठे उदाहरण ठरले. तब्बल ४६ दिवस चाललेल्या या आंदोलनात दीड लाखांहून अधिक नागरिकांचा सहभाग लाभला. ही केवळ आंदोलनाची आकडेवारी नव्हती, तर अमोल खताळ यांच्या जनसंपर्क कौशल्याची, संयमाची आणि लोकांशी असलेल्या नात्याची ती जिवंत साक्ष होती. या आंदोलनानेच त्यांच्या राजकीय वाटचालीला नवी दिशा दिली.

हिंदुत्व आणि गोवंश रक्षणाच्या मुद्यावर त्यांनी कायम ठाम भूमिका घेतली. भारतीय जनता पक्षाच्या कार्यकाळात संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून सुमारे १६ हजार गरजूंना न्याय मिळवून देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. यातून त्यांच्यातील संवेदनशील आणि लोकाभिमुख प्रशासकाचे दर्शन घडले. संगमनेरच्या प्रस्थापित राजकारणाला आव्हान देताना त्यांच्यासमोर अनेक अडथळे आले. आर्थिक आमिषे दाखवली गेली, दबाव आणण्याचे प्रयत्न झाले, मात्र समर्थ रामदास स्वामींच्या "मना सज्जना भक्तिपंथेचि जावे" या विचाराला कवटाळत त्यांनी प्रामाणिकतेचा मार्ग कधीही सोडला नाही. प्रलोभनांच्या चिखलात अडकण्याऐवजी त्यांनी स्वच्छ आणि पारदर्शक राजकारणाचा आदर्श उभा केला. निवडणुकीच्या काळात 'लाडकी बहीण' योजनेचे अर्ज मोफत भरून देण्याच्या उपक्रमातून ते खऱ्या अर्थाने घराघरात पोहोचले. अवघ्या १० ते १२ दिवसांच्या झंझावाती प्रचारात पायाला भिंगरी बांधून त्यांनी मतदारसंघ पिंजून काढला आणि प्रस्थापितांना धक्का देणारा ऐतिहासिक विजय मिळवला. हा विजय केवळ निवडणुकीतील यश नव्हता, तर गेल्या पंचवीस वर्षांच्या सातत्यपूर्ण जनसंपर्क, संघर्ष आणि लोकविश्वासाचे फलित होते.

आमदार म्हणून निवडून आल्यानंतरही त्यांच्या कामाचा वेग कमी झालेला नाही. भोजापूर पुरचारीला पाणी सोडून दुष्काळी भागातील नागरिकांची तहान भागवण्याचा त्यांचा प्रयत्न हा अनेकांसाठी 'भागीरथी कार्य' ठरला. पुणे-नाशिक रेल्वेमार्ग, तालुक्यातील नवी औद्योगिक वसाहत, रोजगारनिर्मिती आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला आहे. आजच्या झगमगाटाच्या आणि दिखाऊ राजकारणाच्या युगात अमोल खताळ हे सर्वसामान्यांसाठी सहज उपलब्ध असलेले नेतृत्व म्हणून ओळखले जातात. सत्तेचा गर्व डोक्यात न जाऊ देता, पाय जमिनीवर ठेवून काम करणारा हा 'कार्यकर्ता आमदार' अनेक तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे.

संघर्ष, प्रामाणिकपणा, जनसेवा आणि विकासाची धडपड यांचा सुंदर मिलाफ असलेले आमदार अमोल खताळ हे संगमनेरच्या राजकारणातील एक 'महामेरु' म्हणून आज उदयास आले आहेत. त्यांच्या या धडाडीला, अढळ आत्मविश्वासाला आणि जनतेसाठी झटणाऱ्या सेवाभावी कार्याला भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

## 'अदा स्टार ऑफ महाराष्ट्र २०२६'चा पुण्यात सोहळा

पुणे : (स. गांवकरी)



महिलांच्या अंगभूत कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्यातील आत्मविश्वास वृद्धिंगत करण्यासाठी 'अदा द फॅशन स्टुडिओ'च्या वतीने 'अदा स्टार ऑफ महाराष्ट्र 2026 – सीजन 5.0' या भव्य पारंपरिक फॅशन शोचे आयोजन करण्यात आले आहे. हा दिमाखदार सोहळा सोमवार, दिनांक १७ मे २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजता पुण्यातील स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा मंच येथे पार पडणार आहे. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे पुण्यातील नामवंत डिझाइनर आणि संस्थांनी साकारलेली वेशभूषा असणार आहे. यामध्ये विख्यात MNVTI डिझाइनर कॉलेज, वस्त्रवेद, द्रौपदी वस्त्रम आणि अनवी द रेंटल बुटीक यांचा समावेश आहे. या फॅशन शोसाठी ज्वेलरी पार्टनर म्हणून न्यू साईणकर ज्वेलर्स आणि स्वामिनी सारीज अँड ज्वेलरी यांनी सहभाग नोंदवला आहे. तसेच, स्पर्धकांचा साजश्रृंगार पुण्यातील प्रसिद्ध सेलिब्रिटी मेकअप आर्टिस्ट माधुरी खेसे आणि त्यांच्या टीममार्फत केला जाणार आहे. केवळ फॅशनच नव्हे, तर समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा गौरव या व्यासपीठावर केला जाणार आहे. कार्यक्रमाच्या आयोजिका सौं. निलम शेलार यांनी सांगितले की, महिला सक्षमीकरण आणि त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

## निलेश सोमानी यांची दैनिक समर्थ गांवकरी कार्यालयास भेट!



अकोले : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे भावी प्रदेशाध्यक्ष म्हणून चर्चेत असलेले निलेश सोमानी यांनी दैनिक समर्थ गांवकरी कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा जपत तुकाराम महाराज पगडी, शाल, पुष्पगुच्छ, दैनिक समर्थ गांवकरी दिनदर्शिका, दैनंदिनी तसेच बॅग देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. सत्कार कार्यक्रमावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अकोले तालुका सचिव हरिभाऊ फापाळे, सरपंच प्रशांत बंदावणे तसेच राहुल आरोटे उपस्थित होते. यावेळी पत्रकारिता, सामाजिक बांधिलकी आणि ग्रामीण भागातील माध्यमांच्या भूमिकेबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. दैनिक समर्थ गांवकरी समूहाने ग्रामीण पत्रकारितेत केलेल्या कार्याचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

# अकोले भूमी अभिलेख कार्यालय बनले अधिकाऱ्यांचे "खाजगी मालकीचे" कार्यालय?

**नागरिकांचा संताप; एजंटराज, पैसेवसुली आणि अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीबाबत गंभीर आरोप!**







(स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तहसील कार्यालयाच्या पाठीमागे असलेले भूमी अभिलेख कार्यालय सध्या सर्वसामान्य नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत असून, हे कार्यालय अधिकाऱ्यांच्या "खाजगी मालकीचे" बनल्याची तीव्र भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. ग्रामीण व आदिवासी भागातील शेतकरी, महिला आणि वयोवृद्ध नागरिक मोठ्या अपेक्षेने या कार्यालयात येतात; मात्र येथे अधिकारी आणि कर्मचारी वेळेत उपस्थित नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याचे चित्र आहे.

गुरुवारी अकोलेचा आठवडे बाजार असतानाही कार्यालयात एकही जबाबदार अधिकारी उपस्थित नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. विशेष म्हणजे सोमवार आणि गुरुवारी अधिकाऱ्यांनी कार्यालयात हजर राहण्याच्या सूचना असतानाही संबंधित अधिकारी अनुपस्थित असल्याचे दिसून आले. कार्यालयात केवळ दोन शिपाई कर्मचारी उपस्थित होते. नागरिकांनी विचारणा केल्यावर "कोणताही अधिकारी उपलब्ध नाही, त्यामुळे काम होणार नाही," असे उत्तर देण्यात येत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

कार्यालयातील अनेक अधिकारी रजेवर असल्याचे सांगितले जात असले, तरी त्याबाबत कोणतीही अधिकृत नोंद किंवा अर्ज कार्यालयात उपलब्ध नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. भूमी अभिलेख अधिकारी श्रीमती साबळे रजेवर असल्याचे सांगितले जात असताना इतरही अधिकारी अनुपस्थित असल्याचे दिसून आले. मात्र, त्यांच्या अनुपस्थितीबाबत स्पष्ट माहिती देण्यास कोणीही तयार नसल्याचा आरोप नागरिकांनी केला.

भूमी अभिलेख कार्यालयात एजंटांचा मोठ्या प्रमाणात वावर असून, कोणतेही काम एजंटाशिवाय होत नसल्याची गंभीर तक्रार नागरिकांनी केली आहे. मोजणी, नकाशे, फेरफार, उतारे किंवा इतर शासकीय कामांसाठी नागरिकांकडून "चेरीमिरी" घेतली जात असल्याचे आरोप करण्यात आले आहेत. पैसे दिल्यानंतरही अनेकांची कामे महिनोन्महिने प्रलंबित राहत असल्याने नागरिक संतप्त झाले आहेत.

विशेष म्हणजे काही एजंटांकडे अधिकाऱ्यांच्या सह्या असल्याचा संशय व्यक्त होत असून, बोगस सह्यांच्या आधारे कामे केली जात असल्याचेही बोलले जात आहे. त्यामुळे या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित एजंट आणि अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

दिवसभर कार्यालयात अधिकारी नसतात; मात्र शनिवारी, रविवारी किंवा रात्रीच्या वेळेस काही अधिकारी कार्यालयात येतात आणि लोकांच्या अर्जांमध्ये त्रुटी काढण्याचे काम केले जाते, असा आरोप नागरिकांनी केला आहे.

"रात्री सखेळ चाले" अशा शब्दांत नागरिकांनी कार्यालयातील वातावरणावर प्रश्न उपस्थित केले आहेत. नेमके रात्री कोणती कामे चालतात, कोण येते-जाते, याबाबतही सखोल चौकशीची मागणी होत आहे.



**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

### "मुक्ताळकरला मुक्त करा" : नागरिकांची मागणी!

**अकोले परिसरात "मुक्ताळकरची उचल बांगडी करा", "त्यांची बदली गडचिरोलीला करा" अशा मागण्या नागरिकांकडून होत आहेत. "मुक्ताळकरच्या मुक्तफळ्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत," अशी प्रतिक्रिया काही संतप्त नागरिकांनी व्यक्त केली. या संपूर्ण प्रकरणाकडे जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, संबंधित आमदार तसेच जिल्हा भूमी अभिलेख अधिकारी कदम यांनी गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी संघर्ष, एजंटराज, पैसेवसुली, नागरिकांची अडवणूक आणि संशयास्पद कामकाज यामुळे सर्वसामान्य जनता त्रस्त झाली असून, तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.**

राज्यातील सर्वात उंच शिखर कळसुबाई पर्वतरांगांच्या परिसरातील आदिवासी व दुर्गम भागातील शेतकरी जमिनीच्या मोजणीसाठी तातडी शुल्क भरूनही महिनोन्महिने प्रतीक्षा करत आहेत. अनेक वेळा कार्यालयाच्या चकरा मारूनही मोजणी होत नसल्याने महिला आणि वयोवृद्ध नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

"शेती हीच आमची उपजीविका आहे; पण जमिनीच्या मोजणीसाठी अधिकारी वेळ देत नाहीत. पैसे घेतले जातात, मात्र काम होत नाही," अशी व्यथा काही नागरिकांनी व्यक्त केली.

या संपूर्ण प्रकरणात "मुक्ताळकर" नावाच्या कर्मचाऱ्यावर नागरिकांनी गंभीर आरोप केले आहेत. अनेकांकडून पैसे घेतले, कामे रखडवली, वयोवृद्धांना त्रास दिला, अशा तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत.

याआधी ज्या-ज्या ठिकाणी त्यांनी काम केले, तेथेही नागरिकांना त्रास दिल्याचे आरोप होत आहेत.

**विशेष म्हणजे सलग तीन महिने कामावर उपस्थित नसतानाही त्यांना पगार देण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.**

# वसमतमध्ये झाडांची सर्रास कत्तल

वसमत : (स. गांवकरी)



नगर परिषद हद्दीतील तब्बल दहा ते पंधरा लिंबाच्या झाडांची निर्घृणपणे कत्तल करण्यात आल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. पर्यावरणाचा समतोल राखणारी झाडे तोडली जात असताना वनविभाग आणि नगरपालिका मात्र जबाबदारी झटकण्यात व्यस्त असल्याचे चित्र समोर आले आहे. या झाडतोडीला अधिकृत परवानगी होती का?, याची माहिती घेण्यासाठी आमच्या प्रतिनिधींनी वनविभाग अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, ते नगर परिषद हद्दीत येते, त्यामुळे नगरपालिकेकडून परवानगी घेतली जाते असे सांगून वनविभागाने हात वर केले. मात्र नगरपालिकेच्या संबंधित एस आय अधिकाऱ्यांना याबाबत विचारणा केली असता त्यांनी थेट मी विचारतो उद्या नाही, दोन दिवस सुट्टी आहे सोमवारी सांगतो, मुद्द्यालाच बगल देत असंबंधित उत्तरे दिली. त्यामुळे या संपूर्ण प्रकारावर संशय अधिकच बळावला आहे. शहरात एखादा सामान्य नागरिक छोटासा नियम मोडला तरी दंड व कारवाई करणारे प्रशासन, एवढ्या मोठ्या प्रमाणावर झाडांची कत्तल होत असताना मात्र 'आम्हाला माहिती नाही'च्या भूमिकेत दिसत आहे.

**जाहीर लिलाव**

तमाम नागरिकांना कळविण्यात येते की अकोले पोलीस स्टेशनच्या आवारात काही बेवारस वाहने पडून असून सदर वाहनांचे लिलावासंबंधी कायदेशीर कार्यवाही पूर्ण झाली असून त्यांचा जाहीर लिलाव सोमवार दिनांक ११/ ५ /२०२६ रोजी सकाळी १०:०० वा. करण्यात येणार असून सदर लिलावामध्ये ज्यांना कोणाला भाग घ्यावयाचा आहे त्यांनी लिलावासंबंधी सर्व गोष्टींची पूर्तता करून वेळेवर अकोले पोलीस स्टेशन येथे हजर राहावे .

**मोहन बोरसे**
**पोलीस निरीक्षक**
**अकोले पोलीस स्टेशन.**

**ग्रामपंचायत पारगाव तर्फे आळे, ता.जुन्नर, जि.पुणे**

ग्रुप ग्रामपंचायत पारगाव तर्फे आळे, ता.जुन्नर, जि.पुणे यांचे तर्फे जिल्हा परिषद पुणे यांचे कडील पंजीकरण / नोंदणीकृत केलेल्या योग्य त्या वर्गातील पात्र कंत्राटदारकडुन दोन लिफाफ्यात खालील कामांची निविदा मागविण्यात आहेत. निविदांचा नमुना ग्रा.पं.कडून दि. ०८/०५/२०२६ ते १५/०५/२०२६ पर्यंत स्विकारल्या जातील आणि येणाऱ्या मासिक मिटींगमध्ये उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | निविदा रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | कामाची कालवधी | निविदा प्रसिध्दी दि. | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे पारगाव तर्फे आळे गावठाण अंतर्गत सिमेंट क्राँक्रीटीकरण रस्ता करणे. | ग्रामनिधी सन २०२४–२६ | ३५३०४५/– | –//– | १ % | ३ महिने | ८ मे २०२६ | सु.बे.अ. १ ते ७ चा वर्ग |

टिप : कोणत्याही निविदा /दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा, काम रद्द करण्याचे सर्व अधिकार ग्रामपंचायतने खालील स्वाक्षरीत राखून ठेवला आहेत. वरील सर्व कामाबाबत नियम, अटी शर्ती सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालय पारगाव तर्फे आळे, ता. जुन्नर जि. पुणे यांचे नोटीस बोर्डवर पाहण्यास मिळेल.

**सरंपच**
**ग्रामपंचायत पारगाव तर्फे आळे, ता.जुन्नर, जि.पुणे**

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत पारगाव तर्फे आळे, ता.जुन्नर, जि.पुणे**

## एल-निनोच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यासाठी

# विशेष जिल्हा चारा सुरक्षा आराखडा

**नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)**

यंदाच्या मान्सूनवर ‘एल-निनो’चा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केल्याने संभाव्य चारा टंचाई टाळण्यासाठी नांदेड जिल्हा प्रशासन आणि पशुसंवर्धन विभाग सतर्क झाले आहे. जिल्ह्यातील पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत विशेष जिल्हा चारा सुरक्षा आराखडा तयार करण्यात येणार आहे. पालकमंत्री अतुल सावे, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या निर्देशानुसार हा आराखडा तयार करण्यात येत आहे. जिल्ह्यातील पशुधनाची संख्या लक्षात घेऊन चाऱ्याची उपलब्धता कायम राहावी, यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. आराखड्यानुसार धरणांच्या गाळपेरा क्षेत्रात तसेच नदीकाठच्या जमिनींवर विशेष चारा लागवड मोहीम राबविण्यात येणार आहे. टंचाईच्या काळात चाऱ्याची उपलब्धता राहावी यासाठी मुरघास प्रकल्पांना गती दिली जाणार असून, भविष्यात चारा छावण्यांची वेळ येऊ नये यासाठी चारा साठवणुकीचे नियोजन करण्यात येणार आहे. तसेच चारा साक्षरता अभियान राबवून पशुपालकांना मार्गदर्शन केले जाणार आहे.

पशुपालकांनी कडबा कुट्टी यंत्राचा वापर करून चाऱ्याची बचत व योग्य व्यवस्थापन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. याशिवाय विदर्भ-मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प टप्पा २ अंतर्गत दुग्ध उत्पादक पशुपालकांना १०० टक्के अनुदानावर सुधारित वैरण बियाणे उपलब्ध करून दिले जाणार आहे.

बाहेरील जिल्ह्यात चारा वाहतूकीस बंदी करण्यात येणार आहे. राज्यात सध्या हिरव्या चाऱ्याची ४३.९८ टक्के आणि सुक्या चाऱ्याची २५.१२ टक्के तूट असल्याचे नमूद करण्यात आले आहे. एल-निनोमुळे पावसात घट झाल्यास ही तूट आणखी वाढण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने आतापासूनच उपाययोजना सुरू केल्या आहेत.

जिल्हा नियोजन व विकास समितीमार्फत पहिल्या टप्प्यात १०० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, चारा बियाणे खरेदीसाठी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज) अकोला यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.



ठाणे : दिवा शहरातील साबेगाव येथील ठाणे महानगरपालिकेच्या शाळा क्र ८० मध्ये अनेक दिवसापासून पाणीटंचाईमुळे शालेय विद्यार्थ्यांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत होते परिणामी नगरसेविका अर्चना निलेश पाटील यांनी पुढाकार घेत दिवा प्रभाग समितीचे पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता सुरेश वाघीरे सदर बाब निदर्शनास आणून दिली प्रसंगी उपअभियंता वाघीरे यांनी तात्काळ सकारात्मकता दाखवत लवकरच पाणीपुरवठा सुरळीत केला जाईल असे स्पष्ट केले. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### महापालिकेच्या लेटलतीफ कर्मचाऱ्यांना उपमहापौर धनंजय जाधव यांचा इशारा

अहिल्यानगर (स. गांवकरी) : महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयात उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी सकाळी १० वाजता अचानक भेट देत गेटवर उभे राहून अधिकारी व कर्मचाऱ्यांची हजेरी घेतली. अचानक झालेल्या या तपासणीमुळे कार्यालयात एकच खळबळ उडाली. उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांनी थेट जाब विचारत पुन्हा उशीर झाल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा दिला. महापालिकेच्या कामकाजात शिस्त राखणेअत्यंत गरजेचे असून नागरिकांना वेळेत सेवा मिळाली पाहिजे, यावर त्यांनी भर दिला.यावेळी ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, महापालिका ही केवळ नोकरी करण्याचे ठिकाण नाही, तर ती नागरिकांच्या सेवेसाठी असलेली जबाबदारी आहे. प्रत्येक कर्मचारी हा या व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. आपण वेळेवर कामावर आलो नाही, तर त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या कामांवर होतो. त्यामुळे कामावर एक-दोन तास उशिरा येणे ही गंभीर बाब आहे. ते पुढे म्हणाले, सकाळी पावणे दहा ते सायंकाळी सव्वा सहा या वेळेत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नियमित उपस्थित राहून आपले काम प्रामाणिकपणे पार पाडावे. नागरिकांना त्यांच्या कामासाठी वारंवार फेऱ्या माराव्या लागतात, ही स्थिती बदलणे आवश्यक आहे. प्रत्येकाने वेळेचे भान ठेवून जबाबदारीने काम केल्यास महापालिकेची प्रतिमा उंचावेल. महापालिकेबद्दल आपले कर्तव्य ओळखा. नागरिकांना चांगली, जलद आणि पारदर्शक सेवा देणे हेच आपले ध्येय असले पाहिजे. यापुढे कोणताही कर्मचारी विनाकारण उशिरा येताना आढळल्यास त्याच्यावर नक्कीच कारवाई केली जाईल, असा कडक इशाराही त्यांनी दिला.

### जुन्नर आदिवासी भागात बाजरीच्या शेतात गांजाची १८ झाडे; आरोपी अटक

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर पोलीस स्टेशन येथील पोलिस शिपाई दादा लहानु पावडे यांनी आदिवासी दुर्गम भागामध्ये दि.६ मे रोजी सायं . ६:३० वा. खटकाळे गावात बाजरीच्या शेतात गांजाची १८ झाडे सापडली. याबाबत तालुक्यात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. येथील शेतकरी सोमा सखाराम केदारी वय ६२ वर्षे यांच्या मालकीच्या जमीनीत गट नंबर १५१ शेतामध्ये गांजा या आमली पदार्थाचे झाडाचे बेकायदेशीर रित्या असलेली १.३७८ किलो ग्रॅम वजनाच्या १८ गांजाची लहान मोठी ओली हिरवी झाडे झाडाची लागवड केलेली आढळली. शेतकरी सोमा सखाराम केदारी यांना अटक करून यांच्या विरूध्द ०१३०/ २०२६ एन डी पि एस ऐ सी टी १९८५ चे कलम २० (ब) ।। ऐ ,८ (ब),८ (क) प्रमाणे एन.डी.पी सी प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे . या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक किरण अवचर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पो. स. ई शिंदे करीत आहे.

### नगर शहरातील अश्लिल कृत्यांना प्रोत्साहन देणारी जागा उध्वस्त

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शहरातील सावेडी परिसरात अहिल्यानगर-मनमाड महामार्गावरील झेड.के. बॉलीवुड कॅफे येथे बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या कथित ‘कॅफे’वर तोफखाना पोलीस ठाण्याच्या पथकाने मंगळवारी (५ मे) सायंकाळी छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत कॅफेमध्ये अश्लिल कृत्यांसाठी तयार केलेले बंदिस्त कप्पे आढळून आले असून संबंधितांवर महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, सावेडी परिसरातील सदर कॅफेमध्ये प्लायवुडचे लहान-लहान कप्पे तयार करून त्यांना पडदे लावण्यात आले आहेत. या कप्प्यांमध्ये शाळा व महाविद्यालयीन तरूण- तरूणींना अश्लिल कृत्यांसाठी जागा उपलब्ध करून दिली जात होती. या माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर, उपनिरीक्षक परशुराम दळवी, तसेच इतर पोलीस कर्मचाऱ्यांसह पंचांच्या उपस्थितीत सायंकाळी ६.१५ वाजताच्या सुमारास अचानक छापा टाकण्यात आला. छाप्यादरम्यान पोलिसांची चाहूल लागताच काही युवक-युवती मागील दरवाजातून पळून गेले. कॅफेमध्ये तपासणी केली असता, लाकडी कप्पे तयार करून त्यांना बाहेरून पडदे लावण्यात आलेले आढळले. प्रत्येक कप्प्यात बसण्यासाठी छोटे सोफे ठेवण्यात आले होते. तसेच, प्रत्यक्षात कॅफे चालविण्यासाठी आवश्यक असलेले साहित्य-उपलब्ध नव्हते. कॅफेचा कोणताही वैध परवानाही आढळून आला नाही. छाप्यावेळी काउंटरवर उपस्थित असलेल्या स्वप्निल शंकर डोंगरे (वय-२५, रा. मानपाडा, कल्याण) याने स्वतःला कॅफेचा मालक असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याच्यासह ऋषिकेश सातपुते (पूर्ण नाव व पत्ता माहिती नाही) याच्याविरूध्द गुन्हा नोंदविला आहे.

## निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे साकडे



**'प्रशासनाचा सकारात्मक प्रतिसाद'**

जिल्हाधिकारी व पोलीस प्रशासनाने या संवेदनशील विषयाची गांभीर्याने दखल घेत, तातडीने संबंधित विभागांची बैठक घेऊन कठोर पावले उचलण्याचे आश्वासन दिले आहे. आता या निवेदनानंतर प्रशासनाची 'यंत्रणा' आणि पर्यावरणाची 'मंत्रणा' कशी जुळते, याकडे जिल्हावासीयांचे लक्ष लागले आहे.

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

निसर्ग वाचला तरच मानवजात वाचेल" हा केवळ मंत्र नसून ती काळाची गरज आहे, असा आर्त साद घालत निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाने प्रशासनाचे दार ठोठावले आहे. उन्हाळ्याच्या तडाख्याने होरपळणाऱ्या रानावनात सध्या मानवनिर्मित वणव्यांचे अक्राळविक्राळ रूप पाहायला मिळत असून, याविरोधात प्रशासनाने 'पर्यावरण संरक्षण कायद्या'चा बडगा उचलावा, या मागणीसाठी आज जिल्हाधिकारी कार्यालय व पोलीस अधीक्षक कार्यालयात संवेदनशील सादरीकरण करण्यात आले. गेल्या चार दशकांपासून पर्यावरण चळवळीत सक्रिय असलेल्या या मंडळाने निवेदनात नमूद केले की, वणवा म्हणजे केवळ झाडे जळणे नव्हे, तर त्यासोबत त्या परिसरातील दुर्मिळ वनौषधी, मुके प्राणी, पक्षी आणि त्यांच्या घरट्यांचा होणारा अमानुष 'नरसंहार' आहे. वाढते तापमान आणि पावसाचे बिघडलेले चक्र हे या वणव्यांचेच फलित असल्याचे सांगत, मंडळाने प्रशासनाला आरसा दाखवण्याचे काम केले आहे. केवळ निवेदन देऊन न थांबता, मंडळाने प्रशासनासमोर ५ कलमी कृती आराखडा मांडला आहे. यामध्ये वनक्षेत्रात 'फायर लाईन्स' तयार करणे, उपग्रह तंत्रज्ञानाचा वापर करून त्वरित प्रतिसाद यंत्रणा उभारणे आणि वणवा लावणाऱ्या समाजकंटकांवर कठोर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची आग्रही मागणी करण्यात आली आहे.

हे निवेदन देताना निसर्ग व पर्यावरण क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये मंडळाचे राज्य अध्यक्ष प्रमोद मोरे, कायदेशीर सल्लागार सुरेश लगड, कार्याध्यक्ष छायाताई राजपूत, प्रसिद्धी प्रमुख महेश पाडेकर, सचिव डॉ.अनिल लोखंडे, जिल्हाध्यक्ष तुकाराम अडसूळ,डॉ.बबन जाधव,तसेच चंद्रशेखर हासे, विजय पांडे, शरद पवार, अनिल धीवर आदी पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.

यावेळी बोलताना अध्यक्ष प्रमोद मोरे म्हणाले की, "प्रशासनाने आता कागदी घोडे नाचवण्यापेक्षा प्रत्यक्ष जमिनीवर उतरून कृती करण्याची वेळ आली आहे. जर ही वनसंपदा राखता आली नाही, तर येणाऱ्या पिढ्यांना आपण केवळ राखेचा डोंगर वारसा म्हणून देऊ."

## दिल्लीगेटला १६ व १७ मे ला महिला व उद्योजकासाठी प्रदर्शन

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**



नगर येथील प्रतिबिंब संस्थेच्या वतीने अधिक मासा निम्मित निमित्त महिला उद्योजकता वाढविण्यासाठी व छोटे उद्योजकाच्या सक्षमीकरणासाठी प्रदर्शन आयोजित केले असून ज्यात छोट्या व्यावसायिकांना तसेच मध्यम व्यवसायिकांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येत आहे. दि. १६ व १७ मे २०२६ रोजी २ दिवसीय प्रदर्शन शमी गणपती कार्यालय, दिल्लीगेट, अहिल्यानगर येथे सकाळी १० ते रात्री १० यावेळेत सर्वासाठी खुले असणार आहे,यामध्ये विविध प्रकारचे सुमारे ३० स्टोलचे नियोजन आहे. सर्व व्यावसायिक,गृह उद्योजक या प्रदर्शनातील स्टॉलमध्ये सहभागी होऊ शकतात. स्टॉलची बुकिंग करण्यासाठी व अधिक माहितीसाठी खालील नंबर वर कॉन्टॅक्ट करावा,स्टॉल बुक करण्याची अंतिम तारीख १४ मे २०२६ आहे. संपर्क- प्रतिबिंब संस्था 9284930674,अनुजा कांबळे 9850262595,वनिता मानकर 9130731222 ,जयश्री सूळ 9890615000,ऋतुजा धोत्रे 9405101356 ,प्रिया भागवत 8830656834 यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## ट्रस्ट नियमनाचे अधिकार आता फक्त धर्मादाय अधिकाऱ्यांकडे

**अहिल्यानगर: (स. गांवकरी)**

न्यायालयाचे अधिकार संपुष्टात महाराष्ट्र विधिमंडळाने हिवाळी अधिवेशनात ट्रस्ट कायद्यामध्ये अमूलाग्र बदल करण्याच्या विधेयकाला मंजुरी दिली होती. त्यापैकी सर्वात महत्वाचा बदल म्हणजे नवीन कलम ५० (ब) नुसार एकाद्या ट्रस्टचे ट्रस्टी म्हणून कार्य करण्याचे, ट्रस्टी नेमण्याचे किंवा न्यास पत्र (ट्रस्ट डीड) मध्ये बदल करण्याचे दिवाणी आणि जिल्हा न्यायाधीशांचे अधिकार रद्द करून ते सर्व अधिकार आता केवळ धर्मादाय आयुक्तांना असतील असे नमूद केले होते. मात्र हा बदल विशेष अधिसूचनेद्वार लागू करण्यात येईल असे नमूद केले होते. त्यानुसार २७ एप्रिल रोजी विधी व न्याय विभागाने अशी अधिसूचना जारी करून एक मे २०२६ पासून राज्यातील सर्व दिवाणी व जिल्हा न्यायालयाचे ट्रस्ट किंवा धर्मादाय संस्थांच्या बाबत कोणतेही न्यायिक निर्णय घेण्याचे अधिकार संपुष्टात आल्याची घोषणा केली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुमारे दीडशे वर्ष अनेक धार्मिक ट्रस्टचे विश्वस्त म्हणून पदसिद्ध नियुक्ती झालेले अनेक न्यायिक अधिकारी आजमितीस संपूर्ण राज्यात कार्यरत आहेत. या अधिसूचनेमुळे हे सर्व अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे विविध तरतुदींप्रमाणे राज्यातील धर्मादाय आस्थापनेतील अधिकाऱ्यांकडे आले आहेत.

**राज्यातील धर्मादाय कायदा सन १९५० मध्ये अस्तित्वात आला. या कायद्याआधी स्थापित असलेल्या अनेक धार्मिक मंदिरे, मठ व धर्मादाय कार्य करणाऱ्या संस्थांचे नियमन करण्याचे अधिकार दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ९ नुसार दिवाणी व जिल्हा न्यायालयांना होते. राज्यात स्वतंत्र धर्मादाय आस्थापनेची निर्मिती झाल्यानंतर तब्बल सव्वीस वर्षांने हा बदल झाला आहे.**

**ॲड. शिवराज कदम जहागिरदार**
**माजी अध्यक्ष, पब्लिक ट्रस्ट प्रॅक्टिशनर्स असोसिएशन, पुणे**

## राज्यभरात विक्रमी २२ सामुदायिक व्रतबंध सोहळे संपन्न

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**



ब्राह्मण समाजातील अत्यंत महत्त्वाचा समजला जाणारा व्रतबंध (उपनयन संस्कार/मुंज) हा संस्कार ब्राह्मण सेवा संघ, केडगाव यांच्या वतीने यंदा संपूर्ण महाराष्ट्रात विक्रमी पातळीवर पार पडला. दि. ३ मे २०२६ रोजी एकाच दिवशी सुमारे २२ सामुदायिक व्रतबंध सोहळ्यांचे आयोजन करून संघटनेने एक उल्लेखनीय विक्रम नोंदविला आहे.

व्रतबंध हा मुलाच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. शिक्षणासाठी गुरुगृही पाठवण्यापूर्वी हा संस्कार करण्याची परंपरा असून त्याला धार्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या विशेष महत्त्व आहे. आधुनिक काळातील धावपळ, वेळेची कमतरता आणि वाढते आर्थिक ओझे लक्षात घेता, सामुदायिक पद्धतीने हा संस्कार करण्याची संकल्पना अधिक उपयुक्त ठरत असल्याचे यावेळी अधोरेखित झाले.

ब्राह्मण सेवा संघ, केडगावतर्फे गेल्या तब्बल २८ वर्षांपासून सातत्याने सामुदायिक व्रतबंध सोहळ्यांचे आयोजन करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, ज्यांची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल आहे अशा कुटुंबांतील मुलांचे व्रतबंध मोफत करून समाजाभिमुख कार्याचा आदर्श संघटनेने जपला आहे. याबाबत माहिती देताना संघाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार पोळ यांनी सांगितले की, “समाजातील प्रत्येक घटकाला धार्मिक संस्काराची संधी मिळावी, हा आमचा मुख्य उद्देश आहे.” या भव्य सोहळ्याचे पौरहित्य वेदमूर्ती पंढरपूरकर गुरुजी यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विधी शास्त्रोक्त पद्धतीने पार पडले. सोहळ्याचा एक विशेष आकर्षण म्हणजे सर्व बटूंची पारंपरिक वेशभूषेत वाजतगाजत काढण्यात आलेली मिरवणूक, ज्यामुळे परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले. याच कार्यक्रमात नुकत्याच झालेल्या ऋग्वेद कंठस्थ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून श्रृंगेरी पीठाच्या शंकराचार्यांकडून सन्मानित झालेल्या श्री. वेदांत कुलकर्णी (पंढरपूरकर) यांचा विशेष सत्कार करण्यात आला.ते गेल्या चौदा वर्षांपासून आबासाहेब पटवर्धन वेदशास्र विदयालय,पुणे येथे वेदाचार्यश्रीपादशास्त्री धायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यापन करत आहेत.

विशेष म्हणजे पुरस्कारार्थी श्री वेदांत हे वेदमूर्ती श्री. पंढरपूरकर गुरुजी यांचे चिरंजीव आहेत, ही बाब उपस्थितांसाठी अभिमानास्पद ठरली. कार्यक्रमाला विविध मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. यामध्ये मा. आमदार संग्रामभैय्या जगताप, श्री. सचिनजी जगताप, नगरसेवक श्री. अमोल येवले, नगरसेवक श्री. विजय पठारे, सौ. प्रियाताई जानवे, श्री. विवेक नाईक आणि श्री. योगेश दाणी यांचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. यामध्ये डॉ. श्रीकृष्ण जोशी, ज्ञानेश देशपांडे, प्रशांत देशपांडे, आनंद ठिपसे, दिलीप इनामदार, पंकज जहागीरदार, नितीन क्षीरसागर, धनंजय जामगांवकर, मिलिंद वडाळकर, डॉ. सुधीर कुलकर्णी, विनायक कुलकर्णी, नंदकुमार कुलकर्णी, राजेश कळसे, अजित कुलकर्णी, किरण कुलकर्णी, राहुल पांडव, गिरीश क्षीरसागर, योगी क्षीरसागर, किरण खुर्जेकर तसेच तेजस्विनी महिला ग्रुप यांचा विशेष उल्लेख करण्यात आला. एकूणच, ब्राह्मण सेवा संघ, केडगाव यांच्या या उपक्रमामुळे पारंपरिक संस्कार जपत समाजातील सर्व स्तरांपर्यंत धार्मिक विधी पोहोचवण्याचे कार्य प्रभावीपणे घडून आले असून, हा उपक्रम इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

## तब्बल १. ६१ कोटींच्या अपहाराचा आरोप; राजकीय वर्तुळात खळबळ

**किनवट : (स. गांवकरी)**




किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये तब्बल सुमारे १. ६१ कोटी रुपयांच्या आर्थिक अपहाराचा गंभीर आरोप समोर आल्याने तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. अनेक दिवसांपासून दबक्या आवाजात चर्चेत असलेल्या या प्रकरणाचा अखेर भडका उडाला असून बाजार समितीच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे तालुका अध्यक्ष प्रकाश राठोड यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे इमेल द्वारे तक्रार दाखल केली असून राठोड यांनी या निवेदनाद्वारे बाजार समितीच्या सभापती, उपसभापती, सविव व संचालक यांच्यावर गंभीर आरोप केले आहे. तसेच या प्रकरणी माजी उपसभापती राहुल नाईक यांच्या नेतृत्वाखालील संचालकांनीही स्वतंत्र निवेदन देत अपहाराची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

संचालकांनी दिलेल्या निवेदनानुसार, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मालकीची शेतजमीन विक्री करून प्राप्त झालेली मोठी रक्कम मुदत ठेव स्वरूपात ठेवण्यात आली होती. मात्र ही मुदत ठेव संचालक मंडळाची कोणतीही परवानगी अथवा ठराव न घेता मोडण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याशिवाय समितीच्या इतर खात्यांतील निधी देखील नियमबाह्य पद्धतीने वळवून सभापती आणि सचिव यांनी आर्थिक अपहार केल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

निवेदनात विशेषतः एक्सिस बँक आणि कॅनरा बँकेतील खात्यांचा संदर्भ देण्यात आला असून संबंधित व्यवहारांमध्ये पारदर्शकता नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

संचालक मंडळाला विश्वासात न घेता लाखो रुपयांचे व्यवहार करण्यात आल्याने समितीच्या आर्थिक कारभाराबाबत संशय अधिक गडद झाला आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. बाजार समितीतील या कथित गैरव्यवहारामुळे शेतकरी, व्यापारी आणि हमाल वर्गातही संतापाचे वातावरण निर्माण झाले असून “शेतकऱ्यांच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्यांना पाठीशी घालू नका” अशी तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे.

दरम्यान, या तक्रारीमुळे किनवटच्या राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली असून येत्या काळात हे प्रकरण अधिक तापण्याची चिन्हे आहेत.

संबंधित व्यवहारांची आर्थिक चौकशी, बँक खात्यांची तपासणी तसेच जबाबदार पदाधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी जोर धरत आहे. या निवेदनावर संचालक राहुल गेमसिंग जाधव, सोपान केंद्रे, श्रीराम माणिक कांदे, सुनील घुगे, बालाजी बामने, प्रल्हाद सातव, प्रेमसिंग साबळे, कैलास बिज्जमवार, विद्या संतोष दासरवार, कुसुम मुंडे, अब्दुल सत्तार अब्दुल रहेमान खिच्ची, अनिल संभाजी कऱ्हाळे, अनुसया पेंदोर, राजू सुरोशे, प्रेमसिंग जाधव आणि शेख हैदर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

या संदर्भात सभापती गजानन पाटील मुंडे यांच्याशी विचारणा केली असता त्यांनी सांगितले कि, प्रशासकीय बाब असुन या संदर्भात बाजार समितीचे सचिव रविंद्र राठोड यांच्याशी चर्चा केल्या नंतरच काहीही सांगता येणार आहे. त्यांच्याशी संपर्क झालेला नाही, संपर्क झाल्यावर माध्यमांना कळवेन.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)